वर्ष - 8 । अंक -87 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आजचा रंग हिरावा

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 04 ऑक्टोंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आमदार देवेंद्र भुयार यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खडसावलं

# देवेंद्रचे स्टेटमेंट अतिशय चुकीचं!

## पत्रकारांचा प्रश्न आणि अजितदादांचा आवाज चढला

। पुणे । महाईन्यूज

**"एक नंबरची मुलगी चांगल्या नोकरीवाल्यांना मिळते, दोन नंबरची मुलगी पान टपरी आणि किराणा माल दुकानदारांना मिळते तर तीन नंबरची मुलगी शेतकऱ्याच्या पोराला मिळते" असं अवमानजनक वक्तव्य करणारे आमदार देवेंद्र भुयार यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चांगलंच खडसावलं आहे. "देवेंद्रने केलेलं स्टेटमेंट अतिशय चुकीचं आहे, त्याला मी सांगितलं की तू दिलगिरी व्यक्त कर" असं अजित पवार यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सांगितलं. देवेंद्र भुयार हे अजित पवार यांचे सहयोगी आमदार आहेत. अजित पवार काय म्हणाले?**



पत्रकारांनी देवेंद्र भुयार यांच्यासंबंधी प्रश्न विचारताच अजित पवार म्हणाले, "एक मिनिट... देवेंद्रने केलेलं स्टेटमेंट अतिशय चुकीचं आहे, त्याला मी सांगितलं की तू दिलगिरी व्यक्त कर. माझ्याकडून बोलण्याच्या ओघात अशा प्रकारचं वक्तव्य गेलं, ते अत्यंत चुकीचं होतं, मुलींना वेदना देणारं होतं, शेतकऱ्यांच्या बद्दल अपमान वाटणारं होतं, असं काल रात्री मला कळल्या कळल्या सांगितलं, कारण पाच वर्ष तो माझा सहयोगी म्हणून काम करत होता." असं अजित पवार म्हणाले.

"तो शेतकरी संघटनेतून निवडून आला होता, परंतु काम करत होता. मला त्याने सांगितलं दादा, मी करतो. माझा बोलण्याचा हेतू तसा नव्हता. मला एवढंच सांगायचं होतं, की शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या दृष्टीकोनातून त्यांना लग्नासाठी मुली.. नोकरदारांना प्राधान्य देतात. पूर्वी असा काळ होता की मुली बागायतदारांना प्राधान्य द्यायच्या. पण बोलण्याच्या ओघात तो चुकला. चूक ती चूकच आहे. त्याच्या संबंधी क्लिअर सूचना त्याला दिल्या आहेत. मी सांगितलं की मला अजिबात तुझं स्टेटमेंट योग्य वाटलेलं नाही, ते ताबडतोब मागे, त्याच्याबद्दल दिलगिरी व्यक्त कर, माफी माग, असं सांगितलं आहे." अशी माहिती अजित पवार यांनी दिली.

### अल्पवयीनांचं वय कमी करणार

दरम्यान, बारामतीत दोन दिवसांपूर्वीच शालेय विद्यार्थ्यांचा खून त्याच वर्गातील विद्यार्थ्यांनी केला होता. या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी आज सकाळी बारामतीत पोहोचतात जिल्हा पोलीस प्रमुखांसह इतर पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यामध्ये तातडीच्या उपाययोजना संदर्भात चर्चा केली. यानंतर पत्रकारांशी बोलताना अजित पवार यांनी या वयोमर्यादेबाबत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज लोणावळ्यात

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मावळ दौऱ्यावर, कार्ला गड येथील एकवीरा आईचे दर्शन घेणार

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्या दुपारी मावळ दौऱ्यावर येणार असून कार्ला गड येथील एकवीरा आईचे दर्शन घेणार आहेत. गडावरील पायऱ्यांची दुरूस्ती, संरक्षण भिंत, मुख्य मंदिराची दुरूस्ती, विश्रांती कक्ष अशा ३९.४३ कोटी रुपयांच्या कामांचा शुभारंभ मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.**



महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कार्ला वेहेरगाव येथील कुलस्वामिनी आई एकविरा देवीच्या मंदिरात गुरुवारी घटस्थापना झाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त कार्ला गडावर एकवीरा देवीच्या दर्शनासाठी येत असतात. गडावर येणाऱ्या भाविकांसाठी सुविधा निर्माण करण्याबाबत खासदार बारणे यांनी पाठपुरावा केला होता. त्याची दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्ला गडाचा कायापालट करण्यासाठी मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणातून (एमएमआरडीए) ३९.४३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कंत्राटदाराला वर्क ऑर्डरही देण्यात आली आहे. या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

मंदिर, नगारखाना, स्तंभ व समाधीच्या जीर्णोद्धारासह मंदिर परिसरातील कामे केली जाणार आहेत.

### विविध विकास कामांचा शुभारंभ

मुख्य मंदिर, नगारखान्याची दुरुस्ती, स्तंभ व समाधीच्या दगडी बांधकामाची सफाई आणि सांधे भरणी, सद्यस्थितीतील रांग मंडप उतरवून नवीन रांग मंडप उभारणे, मोकळ्याजागेत बगीचा निर्माण करणे, तिकीटघर व शौचालय बांधणे, डोंगराच्या कठड्याला लागून दगडी पादचारी रस्ता तयार करणे, पायऱ्यांची दुरुस्ती, संरक्षण भिंत, शौचालय, पार्किंगचे बांधकाम, धबधब्या जवळ तटबंधी दुरुस्ती करून विश्रांती क्षेत्र तयार करणे, पायऱ्यांच्या मध्यंतरी दमलेल्या भाविकांसाठी पिण्याचे पाणी, बाकडे आणि कचरापेट्या बसवणे, भाविक व पर्यटकांच्या माहिती व सुरक्षिततेसाठी सूचना फलके बसविण्याच्या कामाचा शुभारंभ होणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

# ते येत नाहीत, दुसऱ्यालाही येऊ देत नाहीत

## मंत्री चंद्रकांत पाटलांवर पक्षाच्या नगरसेवकाचे गंभीर आरोप!

। पुणे ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार निवडीच्या प्रक्रियेत राज्याचे मंत्री आणि कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी दबाव कार्यपद्धतीचा वापर करत इच्छुक कार्यकर्त्यांच्या आत्मसन्माला धक्का लावण्याचा प्रयत्न केला असल्याचा गंभीर आरोप भाजपचे माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांनी केला.**



याबाबत ‘आशावादी’ असल्याचे स्पष्ट करत बालवडकर यांनी मंत्री पाटील यांना थेट आव्हान दिले आहे. आगामी विधानसभेसाठी कोथरूड मतदारसंघातून अमोल बालवडकर हे इच्छुक असून गेल्या काही महिन्यांपासून त्यांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. दोन दिवसांपूर्वी भाजपचे प्रत्येक मतदारसंघात निरीक्षक नेमून पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून उमेदवार कोण असावा, यासाठी मतदान प्रक्रिया राबविली. या प्रक्रियेत कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी दबाव पद्धतीचा वापर केल्याचा आरोप बालवडकर यांनी पत्रकार परिषदेत केला.निवडणूक लढण्यासाठी कार्यकर्त्याने इच्छा व्यक्त करणे हा पक्षातील लोकशाहीचा भाग आहे. परंतु उमेदवार निवडीच्या प्रक्रियेत कोथरूडचे आमदार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी इच्छुक कार्यकर्त्यांचा आत्मसन्मानाला धक्का लावण्याच्या दबावाच्या कार्यपद्धतीचा अवलंब केल्याचा आरोप करत माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांनी पाटील यांना थेट आव्हान दिले. शहरातील सहा मतदारसंघात निरीक्षकांच्या उपस्थितीत झालेल्या या मतदान प्रक्रियेत विद्यामान आमदारांनी पदाधिकाऱ्यांवर दबाव टाकत आपलेच नाव सुचविल्याचे प्रकार घडले आहेत. यामुळे भाजपच्या इच्छुकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.माजी नगरसेवक बालवडकर यांनी थेट पत्रकार परिषद घेत आमदार पाटील यांच्या कार्यपद्धतीवर टीका केली. बालवडकर म्हणाले, पक्षाचा कार्यकर्ता हा निडर असावा. चुकीचे काही होत असेल तर ते मांडणारा असला पाहिजे. भाजपबद्दल काही तक्रार नाही. पण काही व्यक्तींबद्दल तक्रार आहे. पक्षाचे निरीक्षक मतदारसंघात आले होते. त्यासाठी काही ठरविक पदाधिकाऱ्यांना निरोप पाठविण्यात आले होते. निरीक्षकांसमोर विधानसभेसाठी इच्छुक असलेले अमोल बालवडकर आणि शाम देशपांडे यांचे नाव घेवू नये, यासाठी पदाधिकाऱ्यांवर दबाव टाकण्यात आला. उमेदवारी कोणाला द्यायची हा निर्णय वरिष्ठ नेते घेतीलच पण काही नेत्यांमुळे पक्षाची प्रतिमा जनमाणसात मलिन होत आहे.ज्यांनी हा प्रकार केला ते कोथरूडमधील नेते खूप मोठे आहेत.

त्यांच्याबाबत कोणत्या वरिष्ठांकडे जायचे, असा प्रश्न असल्याने पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मत मांडत आहे. दिवंगत खासदार गिरीश बापट असते तर हा प्रकार झालाच नसता. कोथरुडमधून गेल्या दोन महिन्यांपासून तयारी करत आहे. परंतु, भाजपने निरीक्षक प्रक्रियेत मला बहिष्कृत केले. मंत्री चंद्रकांत पाटील माझ्या कार्यक्रमाला येत नाहीत. इच्छुक होणे हा गुन्हा आहे? मला भविष्याची चिंता नाही. आत्मसन्मान दुखावला जात असेल तर तो मांडला पाहिजे. माझ्याबाबत गेल्या दोन महिन्यांपासून होत असलेले हे प्रकार राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे यांना देखील कळविला आहे. मात्र त्यांच्याकडून देखील अद्याप याची दखल घेण्यात आलेली नाही. कोथरुडमधून मतदारांचा प्रतिसाद मिळत असून सर्वसामान्यांची कामे करण्यासाठी आपले प्राधान्य असते.

### आमदारांना अहंकार आलाय

या मतदारसंघात करत असलेले काम पाहता पक्षाकडून निश्चितपणे आपल्यालाच उमेदवारी दिली जाईल, याबाबत ‘आशावादी’ असल्याचे सूचक वक्तव्य बालवडकर यांनी केले. भाजपमधील लोकशाही संपविण्याचा प्रयत्न होत आहे. आमदार पाटील यांना अहंकार आलाय का? असा प्रश्न अमोल बालवडकर यांनी उपस्थित केला. पक्षाचा सर्व्हे गोपनीय होता. तो लीक करण्यात आला. खरा सर्व्हे जनतेचा आहे. आतापर्यंत ३५ हजार कुटुंबीयांना संपर्क केला आहे. त्यामध्ये बहुतांश नागरिकांनी मलाच विधासभेसाठी पसंती दिली आहे. निरीक्षकांनी हा सर्व्हे पहावा, त्यानंतरत निर्णय घ्यावा, असे आवाहन देखील बालवडकर यांनी केले.

# कृषी विकास योजना आणि कृषी उन्नती योजनेला मंजुरी

## दोन्ही योजनेसाठी एकूण 1,01,321.61 कोटी रुपयांची तरतुद

।पुणे ।महाईन्यूज। प्रतिनिधी।

**केंद्र सरकारने देशाची अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि अन्नधान्य उत्पादनात आत्मनिर्भर होण्यासाठी पीएम राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि कृषीउन्नती योजना (केवाय) या १,०१,३२१.६१ कोटी रुपयांची तरतुद असलेल्या योजनांना मंजुरी दिली आहे.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (३ ऑक्टोबर) झालेल्या केंद्रीय कॅबिनेटच्या बैठकीत केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि कृषी उन्नती योजनेला मंजुरी दिली आहे. दोन्ही योजनेसाठी एकूण १,०१,३२१.६१ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. या रक्कमेत केंद्र सरकारचा वाटा ६९,०८८.९८ कोटी रुपये आणि राज्य सरकारांचा वाटा ३२,२३२.६३ कोटी रुपये इतका असेल.

पीएम – आरकेव्हीवाय योजनेसाठी ५७,०७४.७२ कोटी आणि कृषीउन्नती योजनेसाठी (केवाय) ४४,२४६.८९ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे.

खाद्यतेल उत्पादनात आत्मनिर्भर होण्यासाठी राष्ट्रीय खाद्यतेल मिशन योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. २०२४-२५ ते २०३०- ३१ या सात आर्थिक वर्षांत सुमारे १०,१०३ कोटी रुपये खर्च करून ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत मोहरी, भुईमूग, सोयाबीन, सूर्यफूल, तिळाच्या लागवड आणि उत्पादनात वाढीचे उद्दिष्ट्ये आहे. २०२२- २३ मध्ये तेलबियांचे उत्पादन ३९० लाख टन झाले होते. २०३०-३१ पर्यंत ते ६९७ लाख टनांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट्ये आहे, तर एकूण खाद्यतेलाचे उत्पादन पामतेलासह २५४.५ लाख टनांवर नेण्याचे उद्दिष्ट्ये आहे.

### राष्ट्रीय खाद्यतेल मिशनला मंजुरी

हे उत्पादन आपल्या संभाव्य गरजेच्या ७२ टक्के इतके असेल. सुमारे ४० लाख हेक्टरने तेलबियांची लागवड वाढविण्याचे उद्दिष्ट्येही निश्चित करण्यात आले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (३ ऑक्टोबर) झालेल्या केंद्रीय कॅबिनेटच्या बैठकीत केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि कृषी उन्नती योजनेला मंजुरी दिली आहे. दोन्ही योजनेसाठी एकूण १,०१,३२१.६१ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. या रक्कमेत केंद्र सरकारचा वाटा ६९,०८८.९८ कोटी रुपये आणि राज्य सरकारांचा वाटा ३२,२३२.६३ कोटी रुपये इतका असेल.

# चिखली घरकुल समस्या सोडवण्यासाठी 'फास्ट ट्रॅक'वर उपाययोजना!

## महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांचे आश्वासन, आमदार महेश लांडगे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांची बैठक

**। पिंपरी-चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

चिखली घरकूल येथील पायाभूत सोयी-सुविधा आणि समस्यांबाबत 'फास्ट ट्रॅक' वर उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, राज्य शासन आणि केंद्र शासनाने आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना घर मिळावे. या उद्देशाने २००८ मध्ये 'जेएनएनयुआरएम' अंतर्गत चिखली से. १७/१९ नेवाळे वस्ती या ठिकाणी ६ हजार ७२० घरांची निर्मिती करण्याची योजना आणली आहे. २०१४ मध्ये या प्रकल्पातील लाभार्थींना घरांचे वाटप करण्यात आले. मात्र, प्रकल्पाच्या 'डिझाईन'प्रमाणे सोयी-सुविधा विकसित झालेल्या नाहीत. त्यामुळे घरकुलच्या रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, घरकुलमधील प्रतिनिधी यांची एकत्रित बैठक घेण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, घरकुल फेडरेशनचे अध्यक्ष सुधाकर धुरी, उपोषणकर्ते अशोक मगर यासह सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, चिखली घरकुल प्रकल्पाची निर्मिती करताना तेथील भौगोलिक स्थिती आणि भविष्यात वाढणारी लोकसंख्या आणि परिसराचा विकास याचा विचार करुन प्रकल्प उभारला नाही. त्यामुळे मुख्य रस्त्यापेक्षा सखल भागात प्रकल्प उभारला आहे. परिणामी, पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या, ड्रेनेज समस्या यासह पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यात अनेक अडचणी आहेत.




# आरोग्यव्यवस्थेचे बदलते अर्थकारण



भूमिका

**अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत मोठ्या शहरांमधील दवाखाने म्हणजेच तेथील रहिवाशांसाठी दैनंदिन आरोग्यसेवा हे गणित अगदी पक्के होते. काही गंभीर घडल्यावरच लोक रुग्णालयात जात. तेही बहुतांश वेळा ओळखीच्या, छोट्या रुग्णालयात जाण्यास प्राधान्य देत. आज अनेक ठिकाणी हे छोटे दवाखाने झपाट्याने नामशेष होत चाललेले दिसतात.**

महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या देशातील आरोग्याचे बदलते अर्थकारण आणि व्यवस्थापन. आपली शासकीय आरोग्य व्यवस्था अतिरुग्णभाराने त्रस्त झाली आहे. बालमृत्यू, मातामृत्यू, कुपोषण या समस्या आटोक्यात आणण्यात आपण थोडेबहुत यशस्वी होत असताना हृदयविकार, मधुमेह, कर्करोग, मानसिक आजार असे प्रदीर्घ काळ सोबत राहणारे आजार आता झपाट्याने वाढू लागले आहेत. नेमके याच काळात भारताच्या आरोग्य व्यवस्थेचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ दुबळे होताना दिसत आहेत. यातील पहिला म्हणजे शासकीय आरोग्य व्यवस्था. कारण प्राथमिक आरोग्य सेवा, उत्तम तालुका आणि जिल्हा रुग्णालये यासाठी आर्थिक आणि राजकीय पाठबळ अपुरे आहे. दुसरा आधारस्तंभ म्हणजे छोटे दवाखाने आणि रुग्णालये. अगदी आजही छोट्या शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांत साधारणतः ७० ते ७५ टक्के रुग्णसेवा ही खासगी



यंत्रणा पुरवते. किंमत, गुणवत्ता, याबद्दल स्थानिक परिस्थितीनुसार मोठी तफावत आढळते हे खरे, पण तरीही ही रुग्णालये आणि दवाखाने आज आरोग्यव्यवस्थेचा मोठा भाग आहेत. त्यामुळे देशाची आरोग्य सेवा सशक्त करायची असेल तर या दवाखान्यांनाही सक्षम करणे गरजेचे आहे. मात्र देशात एक तिसरी शक्तिशाली यंत्रणा उदयास येते आहे, ती म्हणजे मोठमोठी रुग्णालये आणि त्यांच्याच कंपन्यांनी चालवलेले दवाखाने. सध्या तरी फक्त पाच टक्के लोकसंख्येलाच ते परवडू शकतात. प्रत्येक खासगी रुग्णालयाला त्यांच्याकडील १० टक्के खाटा गरीब रुग्णांसाठी राखून ठेवणे सक्तीचे असले तरी या नियमांची अंमलबजावणी क्वचितच होते. कारण खासगी रुग्णालयांना जास्तीत जास्त नफा कमवायचा असतो. शासनाच्या विमा आणि मदत योजनांची अपुरी आणि विलंबाने होणारी भरपाई आणि सरकारी यंत्रणेतील हेळसांड ही आणखी काही कारणे. केंद्र शासनाच्या 'आयुष्मान भारत' योजनेतील भरपाई शासनाकडून कित्येक महिने मिळत नसल्याच्या अनेक मोठ्या खासगी रुग्णालयांच्या तक्रारी आहेत. गावांमध्येही लोक खासगी दवाखान्यात जाणे पसंत करतात. कारण अनेक शासकीय रुग्णालयांत मिळणारी दुय्यम वागणूक, भ्रष्टाचार, आणि तुलनेने खासगी डॉक्टरकडे गेल्यावर 'आपले कोणीतरी ऐकून घेते आहे' हा विश्वास. पुढील काही वर्षांत मात्र हे छोटे दवाखाने अस्तित्वात राहतील का, हा प्रश्न आहे. भारतात होणाऱ्या या बदलांमागे आरोग्यसेवेची रचना हा मूलभूत मुद्दा आहे. उदारीकरणादरम्यान सार्वजनिक-खासगी सहभागातून आरोग्य व्यवस्था सशक्त करावी, अशी सूचना जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून होऊ लागली. भारतामध्ये खासगी आरोग्य यंत्रांचा शिरकाव ३०-३५ वर्षांपूर्वी झाला होताच, पण आज त्याची वाटचाल झपाट्याने केंद्रीकरणाकडे चाललेली दिसते. गेली १५ वर्षे भारतातील उच्च-मध्यम वर्गाच्या क्रयशक्तीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या वर्गामध्ये आरोग्यविमा घेण्याचे प्रमाणही वाढू लागले असून तो मोठ्या रुग्णालयांना पसंती देत आहे. अनेक रुग्णालये चालवणाऱ्या मोठ्या कंपन्या आज बाह्यरुग्ण विभाग किंवा दवाखानेही चालवू लागल्या आहेत. आणि अगदी १५-२० वर्षांपूर्वीपर्यंत सर्रास आढळणारे छोटे दवाखाने आज जवळ जवळ लुप्त होत आहेत. छोटे दवाखाने बंद पडत असले, तरी आज खासगी आरोग्य क्षेत्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक होते आहे. याचे कारण आरोग्य क्षेत्रात मिळू शकणारा अमाप नफा आणि त्याच्या तुलनेत कायद्यातील शिथिलता. आरोग्य आणि औषधी क्षेत्रात मुळातच माहिती आणि ज्ञानाची असमानता आहे. रुग्णालयात गेलेल्या रुग्णांना त्या चक्रातून बाहेर पडून स्वतःचे निर्णय घेता येणे अवघड जाते. अर्थात पूर्वी सगळे आलबेल चालले होते असे नाही. परंतु आज निव्वळ नफा कमावण्यासाठी हितसंबंधांचे एक जाळे तयार झालेले आहे आणि त्यातील गैरव्यवहार आणि आर्थिक नफा चक्रावून टाकणारा आहे.

## प्रासंगिक »

## ओढ 'बॅलट'ची?

***आता ९० सदस्यांची विधानसभा भरेल आणि लोकनियुक्त सरकारही त्या प्रांतास मिळेल; तेव्हा केंद्राने आपली लुडबूड थांबवणे इष्ट..***

देशबांधवांकडून होणारी उपेक्षा, धर्म या योगायोगामुळे सतत घेतला जाणारा संशय, 'कडे-कडे'ने जगणे नशिबी आल्याने निष्ठांबाबत निर्माण केले जाणारे प्रश्न या आणि अशा अन्य अनेक मुद्द्यांवरील नकारात्मकता आणि नैराश्य बाजूस सारत जम्मू-काश्मिरातील नागरिकांनी भरघोस मतदान केले ही हरखून जावे अशी बाब. त्या राज्यांतील मतदारांस आपल्या लोकशाही निष्ठा व्यक्त करण्याची ही संधी मिळाली याचे श्रेय सर्वोच्च न्यायालयाचे. मतदान शांततेत पार पाडल्यावर विजयी खुणा आणि मुद्रेद्वारे निवडणूक आयोग भले आपले 'यश' साजरे करत असेल. पण त्यास यासाठी भरीस घातले सर्वोच्च न्यायालयाने. हे न्यायालय कणखरपणे निवडणुकीचा आग्रह न धरते तर या राज्यांतील नागरिकांस अजूनही त्यापासून वंचित राहावे लागते. या राज्यातील मतदानाच्या शेवटच्या फेरीत जवळपास ६९.२१ टक्के इतके मतदान झाले.

"बुलेट'ला ओढ 'बॅलट'ची?' हा अग्रलेख (३ ऑक्टोबर) वाचला. निवडणूक निकालानंतर भाजपला अपेक्षित यश न मिळाल्यास जम्मू- कश्मीरमध्येही नायब राज्यपालांच्या अड्डून सत्तेची सर्व सूत्रे केंद्र सरकार आपल्या हातात ठेवेल यात शंका नाही. राजकीय विरोधकास नामोहरम करण्याचाही प्रयत्न होईल.

# काश्मीरला गरज सकारात्मक राजकारणाची

कुरघोडीच्या राजकारणास बळ मिळेल. तेथील तरुणांनाही देशातील इतर तरुणांप्रमाणे विकास, रोजगार, नोकऱ्या हव्या आहेत. तिथे निर्माण झालेले प्रश्न विकासाशी नव्हे, तर राजकारणाशी निगडित आहेत. काश्मीर प्रश्न चिघळण्यामागे आजवरच्या अनेक चुकीच्या राजकीय निर्णयांचा मोठा हातभार आहे. आज काश्मिरी जनता विकासाबरोबरच न्यायाच्याही प्रतीक्षेत आहे. विधानसभा निवडणुकीतील वाढलेल्या मतदानावरून हेच स्पष्ट होते. सरकारकडून कायम अन्याय होत असल्याची भावना आणि त्या भावनेला शेजारी राष्ट्राकडून दिली जात असलेली हवा यातून मोठ्या प्रमाणात असंतोष जन्म घेतो व त्यातून मोठ्या प्रमाणात हिंसा भडकते. निवडणुकीत कोण हरले, कोण जिंकले हा प्रश्न तुलनेने गौण ठरणार आहे. बॉम्ब आणि बंदुकीच्या धाकावर मात करत लोकशाहीचा विजय होणे ही बाब निवडणुकीतील निकालापेक्षा जास्त



महत्त्वाची ठरणार आहे. कश्मीरला लोकशाहीच्या मूळ प्रवाहात आणायचे असेल तर केंद्रातील भाजप सरकारने सत्ताकेंद्रित राजकारण न करता सकारात्मक राजकारण केले पाहिजे. भविष्यात कश्मीरमधील अनेक प्रश्नांची उत्तरे त्यातून मिळू शकतात."बुलेट'ला ओढ 'बॅलट'ची?' हा अग्रलेख (३ ऑक्टोबर) वाचला. जम्मू व काश्मीर विधानसभेची पहिलीच निवडणूक शांततेत पार पडली याबद्दल केंद्र सरकार, सर्व पोलीस दले, लष्कर आणि स्थानिक प्रशासनाचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. पण दहशतीच्या सावटाखाली जगणारे हे खोरे अनुच्छेद ३७० रद्द करून पाच वर्षे उलटल्यानंतर तरी विकासाच्या मुख्य प्रवाहात आले का? बाहेरील नागरिकांना जमीन खरेदीचा अधिकार मिळाला पण प्रत्यक्षात किती जमीन खरेदी झाली? उद्योगधंदे किती आले? यापैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर सकारात्मक नाही.विकास ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. आजही तेथील तरुण फळे विकून गुजराण करतात आणि वृद्ध पशुपालन आणि दुग्ध विक्रीवर अवलंबून आहेत. ही परिस्थिती बदलणे अपेक्षित आहे. तेथील समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आधी त्या राज्यात स्थिर सरकार हवे. केंद्र सरकारनेही दरवेळेस सर्वोच्च न्यायालयाने कान टोचण्याची वाट पाहू नये. या भागात शांतता प्रस्थापित होणे देशाच्या राजकीय स्वास्थ्यासाठी आवश्यक ठरते."बुलेट'ला ओढ 'बॅलट'ची?' हे संपादकीय वाचले. लोकशाहीत नागरिकांना मतदानाचा अधिकार आणि लोकनियुक्त सरकारपासून वंचित ठेवले तर सत्ताधाऱ्यांविरोधात असंतोष निर्माण होणे नैसर्गिक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## महिला सक्षमीकरण, बालसुरक्षा आणि युवकांना जागृत करण्यासाठी

# बारामतीत शक्ती अभियान!

### महिला सुरक्षेसाठी समर्पित हेल्पलाईन 'शक्ती' : अजित पवार

। बारामती ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज बारामतीत बुथ कमिटीच्या बैठकीला उपस्थित राहून कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी अजित पवार यांनी बारामतीत महिला सक्षमीकरण, बालसुरक्षा आणि युवकांना जागृत करण्यासाठी शक्ती अभियान सुरू करण्याची घोषणा केली.**






महिलांना अत्याचाराच्या कोणत्याही घटनेची तक्रार करता यावी यासाठी या भागात शक्ती बॉक्स बसविण्यात येणार असून, एक समर्पित हेल्पलाइन क्रमांक (शक्ती क्रमांक - 9209394917) सुरू करण्यात येणार आहे. बारामतीच्या आजूबाजूच्या महत्त्वाच्या ठिकाणी या हेल्पलाईन क्रमांकाचे पोस्टर्स लावण्यात येणार असून, त्यासाठी विशेष युनिट स्थापन करण्यात येणार आहे. "शक्ती नजर (सोशल मीडिया सर्व्हेलन्स) च्या माध्यमातून आम्ही पिस्तुल किंवा तलवारी सारख्या शस्त्रांसह असलेल्या सोशल मीडियावरील पोस्टवर लक्ष ठेवू", असे ते म्हणाले. 'शक्ती भेट'मध्ये विविध ठिकाणी महिलांसोबत बैठका घेऊन त्यांना गुड टच, बॅड टच, सुरक्षितता, अमली पदार्थांचे सेवन आदी विषयांवर प्रबोधन करण्यात येणार आहे, असेही अजित पवार यांनी सांगितले.या प्रकरणाचे गांभीर्य सांगताना ते म्हणाले, 'तुम्ही माझे कार्यकर्ते आहात म्हणून मी तुमच्याशी हे शेअर करत आहे. जर तुमच्या कुटुंबातील कोणी सदस्य चुकीच्या कामात अडकले तर ते तुमच्याशी संबंधित असले तरी मी उदारता दाखवणार नाही. शक्ती दक्षता अभियानांतर्गत व्हॉट्सअॅप, फेसबुक आणि इन्स्टाग्राम सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शस्त्रांसह फोटो पोस्ट करणाऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई केली जाणार आहे. असे अजित पवार यांनी यावेळी सांगितले. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी पक्षांतर्गत गटबाजी आणि मतभेद बाजूला ठेवूया, असे अजित पवार यावेळी म्हणाले. या निवडणुकांना आपण एकजुटीने सामोरे जाण्याची गरज आहे. ३० वर्षांहून अधिक काळ या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे अजित पवार म्हणाले, बारामती मतदारसंघ राज्यात अव्वल कामगिरी करणारा मतदारसंघ व्हावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

#### टपाल कार्यालयामंध्ये शक्ती बॉक्स...

तत्पूर्वी अजित पवार यांनी बारामतीत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन महिला सुरक्षेबाबत चर्चा केली. शक्ती अभियानाविषयी बोलताना ते म्हणाले की, शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये, खाजगी कंपन्या, रुग्णालये, कोचिंग क्लासेस, महिला वसतिगृहे आणि टपाल कार्यालयांमध्ये "शक्ती बॉक्स" बसविण्यात येणार आहे ज्यामुळे महिला आणि मुलींना तक्रारी सादर करता येतील. तक्रारदारांची गोपनीयता राखत संशयास्पद कृतींच्या तक्रारींवर तत्काळ कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## हिंदू जगातील महामूर्ख जमात : संभाजी भिडे

### गणेशोत्सव, नवरात्रोत्सवाचे 'इव्हेंट' झाल्याची टीका

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**हिंदूंना शत्रू कोण आणि मित्र कोण हे कळत नाही. जगातील महामूर्ख जमात म्हणजे हिंदू. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव हे आता 'इव्हेंट' झाले असून ते हिंदू समाजाला नामर्द बनवत आहेत, असे मत 'शिवप्रतिष्ठान युवा'चे संस्थापक संभाजी भिडे गुरुजी यांनी गुरुवारी येथे बोलताना व्यक्त केले.**



नवरात्रोत्सवानिमित्त सांगली शहरासह विविध ठिकाणी शिवप्रतिष्ठानच्या वतीने दुर्गा दौड काढण्यात येते. आज सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून दुर्गा दौडीला प्रेरणामंत्र म्हणून प्रारंभ करण्यात आला. सर्वांत पुढे भगवा ध्वजधारी युवक तर त्या मागे अनवाणी हजारो धारकरी सहभागी झाले होते. माधवनगर रस्त्यावर दुर्गामाता मंदिर येथे देवीची आरती झाली. या वेळी भिडे गुरुजी यांनी उपस्थित धारकऱ्यांना संबोधित केले.भिडे गुरुजी म्हणाले, की शिवाजी महाराजांनी हिंदू समाजाला जगाचे नेतृत्व करण्याचा मार्ग शिकवला. पण सध्या हा धर्म निद्रिस्त झाला आहे. गणेशोत्सव, नवरात्रोत्सवाचे 'इव्हेंट' झाले असून यातील प्रकार हिंदू समाजाला नामर्द बनवत चालला आहे. हिंदू-मुस्लिम भाई भाई, हिंदूंना शत्रू कोण, मित्र कोण; वाईट कोण, चांगलं कोण हे कळत नाही.हजारो तरुण सहभागी दुर्गामाता दौड छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून सुरू होऊन महापालिका, राजवाडा चौक, पटेल चौक, कॉलेज कार्नर या मार्गावरून दुर्गामाता मंदिर या मार्गावर काढण्यात आली.

#### सर्वांत पुढे भगवा ध्वजधारी युवक

या दौडीमध्ये हणमंत पवार, बापू हरिदास, प्रदीप साबने, सिध्दार्थ पेंडुरकर, मिलिंद तानवडे, राहुल बोळाज, राहुल घोरपडे, अविनाश सावंत आदी पदाधिकाऱ्यांसह हजारो तरुण सहभागी झाले होते.नवरात्रोत्सवानिमित्त सांगली शहरासह विविध ठिकाणी शिवप्रतिष्ठानच्या वतीने दुर्गा दौड काढण्यात येते.
आज सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून दुर्गा दौडीला प्रेरणामंत्र म्हणून प्रारंभ करण्यात आला. सर्वांत पुढे भगवा ध्वजधारी युवक तर त्या मागे अनवाणी हजारो धारकरी सहभागी झाले होते.

# ‘मुदा’ प्रकरणी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न!

## प्रदीप कुमार एस. पी.चा आरोप, ईडीकडे कारवाईची मागणी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**म्हैसूर नागरी विकास प्राधिकरण (मुदा) घोटाळा प्रकरणातील तक्रारदारांपैकी एक प्रदीप कुमार एस. पी. यांनी गुरुवारी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि इतर लोक पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला आहे. तसेच सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची विनंती केली.**

लोकायुक्त पोलिसांनी २७ सप्टेंबर रोजी विशेष न्यायालयाच्या आदेशानंतर सिद्धरामय्या, त्यांची पत्नी पार्वती बी एम, मेहुणा मल्लिकार्जुन स्वामी आणि देवराजू (ज्यांच्याकडून मल्लिकार्जुन स्वामींनी जमीन खरेदी करून भेट दिली ) आणि इतरांविरुद्ध एफआयआर नोंदवला होता. राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी सिद्धरामय्या यांच्या विरोधात चौकशी करण्यास दिलेली परवानगी उच्च न्यायालयाने कायम ठेवल्यानंतर विशेष न्यायालयाचा हा आदेश आला.ईडीने सिद्धरामय्या यांच्याविरोधात पोलिसांच्या एफआयआरसह सक्तवसुली प्रकरण माहिती अहवाल (ईसीआयआर) देखील नोंदवला आहे. त्यांच्या पत्नीला १४ भूखंडाचे वाटप करण्यात आलेल्या कथित अनियमिततेबद्दलचे हे प्रकरण आहे. मुदाने मंगळवारी सिद्धरामय्या यांच्या पत्नीला देण्यात आलेले १४ भूखंड परत घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांनी मालकी आणि ताबा सोडण्याचा निर्णय घेतला. मुडाने या भूखंडांची विक्री करार रद्द करण्याचे आदेश दिल्याचे आयुक्त ए. एन. रघुनंदन यांनी सांगितले होते. त्याला तक्रारदारांपैकी एक असलेल्या कुमार यांनी आक्षेप घेतला होता. न्यायालयाच्या परवानगीशिवाय मालमत्तेच्या स्थितीत कोणताही बदल करता येणार नसल्याचे कुमार यांनी ईडीला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. तसेच आरोपींना ताबडतोब अटक केली जावी. असे न केल्यास संपूर्ण प्रकरणातील पुरावे नष्ट केले जाऊ शकतात, असा संशयही त्यांनी व्यक्त केला. शिवाय मुख्यमंत्री आणि इतरांविरुद्ध



पुरावे नष्ट केल्याबद्दल तक्रार दाखल करण्याची विनंतीही त्यांनी ईडीला केली आहे. गुन्ह्यासंदर्भात ईसीआयआरच्या नोंदणी वेळची स्थिती कायम राखली जावी. तसेच यामुळे अधिकाऱ्यांना तपास सुरू ठेवता येईल आणि कायद्यानुसार आवश्यक ती पावले उचलता येतील, असे कुमार म्हणाले. मुदा घोटाळा प्रकरणातील एक तक्रारदार असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या स्नेहमयी कृष्णा तपासासंदर्भात पुरावे देण्यासाठी तसेच नोंदी सादर करण्यासाठी गुरुवारी ईडीसमोर हजर झाल्याचे सूत्रांनी सांगितले.ईडीने समन्स बजावले असून काही कागदपत्रे मागितली आहेत. ती आपण देणार असल्याचे ईडी कार्यालयात जाण्यापूर्वी कृष्णा यांनी पत्रकारांना सांगितले. सिद्धरामय्या यांनी आपण सद्सद्विवेकबुद्धीनुसार काम करत असून सत्याचा विजय होईल असा विश्वास व्यक्त करत घोटाळ्याप्रकरणी विरोधकांनी केलेले आरोप फेटाळून लावले. म्हैसूर आणि राजघराण्यांची प्रमुख देवता चामुंडेश्वरी देवी मंदिराच्या आवारात आयोजित दहा दिवसीय दसरा उत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. भाजप आणि जेडीएस यांनी केलेल्या राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर सिद्धरामय्या यांनी

### माझा न्यायव्यवस्थेवर विश्वास

मुडाने या भूखंडांची विक्री करार रद्द करण्याचे आदेश दिल्याचे आयुक्त ए. एन. रघुनंदन यांनी सांगितले होते. त्याला तक्रारदारांपैकी एक असलेल्या कुमार यांनी आक्षेप घेतला होता. न्यायालयाच्या परवानगीशिवाय मालमत्तेच्या स्थितीत कोणताही बदल करता येणार नसल्याचे कुमार यांनी ईडीला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. तसेच आरोपींना ताबडतोब अटक केली जावी. असे न केल्यास संपूर्ण प्रकरणातील पुरावे नष्ट केले जाऊ शकतात, असा संशयही त्यांनी व्यक्त केला. शिवाय मुख्यमंत्री आणि इतरांविरुद्ध पुरावे नष्ट केल्याबद्दल तक्रार दाखल करण्याची विनंतीही त्यांनी ईडीला केली आहे. गुन्ह्यासंदर्भात ईसीआयआरच्या नोंदणी वेळची स्थिती कायम राखली जावी. तसेच यामुळे अधिकाऱ्यांना तपास सुरू ठेवता येईल.

लोकांचा आणि चामुंडेश्वरीचा आशीर्वाद आपल्याला आहे तोपर्यंत कोणीही काहीही करू शकत नसल्याचे म्हटले आहे. तसेच आपण कोणतीही चुकीची गोष्ट केली नसल्याचा पुनरुच्चारही त्यांनी केला. लोकायुक्त पोलिसांनी २७ सप्टेंबर रोजी विशेष न्यायालयाच्या आदेशानंतर सिद्धरामय्या, त्यांची पत्नी पार्वती बी एम, मेहुणा मल्लिकार्जुन स्वामी आणि देवराजू (ज्यांच्याकडून मल्लिकार्जुन स्वामींनी जमीन खरेदी करून भेट दिली ) आणि इतरांविरुद्ध एफआयआर नोंदवला होता. राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी सिद्धरामय्या यांच्या विरोधात चौकशी करण्यास दिलेली परवानगी उच्च न्यायालयाने कायम ठेवल्यानंतर विशेष न्यायालयाचा हा आदेश आला.ईडीने सिद्धरामय्या यांच्याविरोधात पोलिसांच्या एफआयआरसह सक्तवसुली प्रकरण माहिती अहवाल (ईसीआयआर) देखील नोंदवला आहे.मुदाने मंगळवारी सिद्धरामय्या यांच्या पत्नीला देण्यात आलेले १४ भूखंड परत घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांनी मालकी आणि ताबा सोडण्याचा निर्णय घेतला.

# हरियाणात पुन्हा भाजपाचं सरकार येणार : तन्वर

## भाजपासाठी मतं मागणारा नेता एका तासात काँग्रेसमध्ये

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**कोणत्याही निवडणुकीत मतदान होत नाही तोवर कधीही राजकीय समीकरणं बदलू शकतात. कोणताही लहान-मोठा नेता कुठल्याही क्षणी पक्ष बदलू शकतो. अशीच काहीशी स्थिती हरियाणात पाहायला मिळाली आहे. हरियाणात विधानसभेची निवडणूक अवघ्या काही तासांवर येऊन ठेपली आहे.**

त्यामुळे सर्वच पक्षांचे नेते आपापल्या पक्षांचा, उमेदवारांचा प्रचार करत आहेत. अशातच भाजपाचा एक नेता निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसमध्ये दाखल झाला आहे. हा नेता दुपारी दोनच्या सुमारास भाजपा उमेदवारांसाठी मतं मागत होता. मात्र काहीच वेळात, दुपारी तीनच्या सुमारास त्याने पक्ष बदलला. अशोक तन्वर असं या नेत्याचं नाव असून त्यांनी आता काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.हरियाणा विधानसभा निवडणुकीचा प्रचार काही वेळात थांबणार आहे. त्याआधीच तन्वर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. काँग्रेसचे नेते, खासदार व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज हरियाणातील जींद येथे प्रचारसभा घेतली.



यावेळी अशोक तन्वरही मंचावर उपस्थित होते. त्यांनी राहुल गांधींच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. काही वेळापूर्वी ते भाजपाचा प्रचार करत होते. अशोक तन्वर यांच्या काँग्रेस पक्षातील प्रवेशाचा व्हिडीओ काँग्रेसने त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर शेअर केला आहे.दुपारी १.४५ वाजता अशोक तन्वर यांनी फेसबूकवर एक पोस्ट केली होती. या पोस्टमध्ये ते भाजपाच्या मंचावर दिसत आहेत. त्यांनी नलवा मतदारसंघात भाजपा उमेदवाराच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या संभेला संबोधित केलं. त्यानंतर त्यांनी २.५२ वाजता दुसरी फेसबूक

### एका तासात पक्ष बदलला

अशोक तन्वर यांनी आज नलवा विधानसभा मतदारसंघात भाजपा उमेदवार रणधीर पनिहार यांच्या समर्थनार्थ आयोजित केलेल्या प्रचारसभेला हजेरी लावली. बुधवारी देखील ते पनिहार यांच्या प्रचारासाठी आयोजित रॅलीत सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी दावा केला होता की नायब सिंह सैनी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा तिसऱ्यांदा हरियाणात सरकार स्थापन करेल.कोणत्याही निवडणुकीत मतदान होत नाही तोवर कधीही राजकीय समीकरणं बदलू शकतात. कोणताही लहान-मोठा नेता कुठल्याही क्षणी पक्ष बदलू शकतो.

पोस्ट केली आहे. यामध्ये ते राहुल गांधींबरोबर एकाच मंचावर दिसत आहेत. यावेळी त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. अशोक तन्वर हे हरियाणा निडणुकीत भाजपाच्या स्टार प्रचारकांपैकी एक होते. भाजपाने त्यांना निवडणूक प्रचार समितीचे सदस्य म्हणून नेमलं होतं. मात्र आज दुपारी ते राहुल गांधी यांच्या जींद येथील प्रचारसभेवेळी काँग्रेसच्या मंचावर दाखल झाले आणि त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

# नवरात्रौत्सवाचे आध्यात्मिक आणि धार्मिक महत्त्व!



## नवरात्रातील घट हे गर्भाचं प्रतीक...

दिव्य अशा नऊ रूपांची पूजा या नऊ दिवसांत करतात. स्त्रीला प्राप्त असलेली अद्भुत शक्ती म्हणजे ती गर्भ धारण करू शकते. बीज रूप असलेल्या गर्भास अन्न पाणी देऊन त्याचं पोषण करते. नवरात्रातील घट हे गर्भाचं प्रतीक आहे. सर्जनाचा हा उत्सव आहे. आदिशक्ती जगदंबा ही संपूर्ण विश्वामधली मातृ शक्ती, जननी, पालनकर्ती आहे. शरीरामध्ये वसलेल्या चक्रांवर तिची सत्ता आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांत तिची नऊ स्वरूपांत पूजा होते. प्रथम शैलपुत्री ही पर्वतकन्या असून ती वृषभावर आरूढ झालेली आहे. ही दिव्य स्वरूप असून तिच्या आराधनेमुळे सर्व रोगांचं हरण होतं. द्वितीय ब्रह्मचारिणी ही पार्वती आहे. ती श्वेतवस्त्रा असून हातात कमंडलू व जपमाळ धारण केली आहे. ही वैराग्याचं प्रतीक आहे. स्वाधिष्ठान चक्रावर हिची सत्ता आहे. माता चंद्रघंटा ही सुवर्ण वर्ण असून तिनं अर्धचंद्र धारण केला आहे. ती अष्टभुजा, शस्त्रधारिणी आहे.चतुर्थ रूप आहे माता कुष्मांडा. जिच्या स्मित हास्यापासून ब्रह्मांड उत्पन्न झालं आहे. ही पुनरुत्पादन आणि नवनिर्मितीची देवता आहे. पंचम रूप स्कंदमाता ही कार्तिकेय माता आहे. ही ज्ञानस्वरूप आहे. सिंहारूढ आहे. षष्ठ रूप माता कात्यायनी. ही मातृस्वरूप आहे. स्त्रीच्या ठायी असलेली संगोपन करण्याची क्षमता हिच्या पूजनानं प्राप्त होते. कालरात्री ही कालस्वरुपिणी असून, विश्रांतीचं प्रतीक आहे. साक्षात् काल हिच्या ठायी वास करतो. हे देवीचं सातवं स्वरूप आहे. उग्र रूप असलं तरीही शुभंकर आहे.अष्टम रूप म्हणजे महागौरी. गौरवर्ण, मुक्त केशा अशी ही माता ज्ञान आणि शांततेचं प्रतीक आहे. ही सौम्य रूपा आहे. आईचं नववं रूप म्हणजे सिद्धीदात्री. हिच्या पूजनानं साधकाला अष्ट सिद्धी प्राप्त होतात. तेज आणि सात्विक वृत्तीची जोपासना होते. ही कमलासना आहे. सौम्य रूप आहे. नवरात्रीमध्ये ब्रह्मांड शक्ती ही जागृत अवस्थेत असते. या काळात स्त्रियांनी केलेली व्रत पूजा ही अतिशय फलदायी ठरते, असं म्हणतात. तसंच या दिवसांत देवीला नवविध रंगांची फुलं, वस्त्रं, आभूषणं आदी अर्पण केली जातात. आठवड्यातील प्रत्येक वाराप्रमाणे परिधान केलेली वस्त्रं नवग्रहांच्या शुभ लहरी जागृत करतात, असं मानलं जातं. चंद्राचा रंग शुभ्र, मंगळाचा रक्त वर्ण, बुधाचा हरित, गुरूचा पिवळा, शुक्राचा गुलाबी तर शनीचा राखाडी असे रंग परिधान करावे, असं सांगतात. महाराष्ट्रात साडेतीन हे शक्तिपीठं आहेत.



## आपली संस्कृती ही मातृपूजन संस्कृती

महाराष्ट्राची कुलदेवता तुळजा भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची श्री रेणुका माता आणि वणीची श्री सप्तशृंगी. हा स्त्री शक्तीचा जागर करण्याचा काल आहे .शुंभ-निशुंभ, रक्तबीज, महिषासुर आदी राक्षसांना मारून आदिमाया विश्रांती घेते. या काळात जगदंबेची उपासना लोक विविध प्रकारे करतात. घटस्थापना, अखंड दीप, माला बंधन, नऊ दिवस उपवास, तसेच श्री सप्तशती पठण, नवचंडी हवन बळी, देवीचा गोंधळ, जागरण इत्यादी प्रथा-परंपरा दिसून येतात. या नऊ दिवसात कुमारिका पूजनाचं विशेष महत्त्व आहे. महानवमीला या उत्सवाचं पारणं होतं. दसऱ्याला माता सिंहारूढ होऊन सीमोल्लंघन करते आणि या उत्सवाचा समारोप होतो. काया वाचा मने शुद्ध राहून हे नऊ दिवस अंबेचा जागर करावा. मनातील सात्विक भाव जागृत करावे आणि शरीरशुद्धी करावी. या काळात सर्वसामान्य स्त्रीच्या ठायी सुद्धा एक प्रकारचं तेज निर्माण होतं. आपली संस्कृती ही मातृपूजन करणारी आहे, स्त्रीला सन्मान देणारी आहे. स्त्रीनंसुद्धा स्वतःचं अस्तित्व, सत्व जपून दुष्ट शक्तींचा नाश करावा, हेच प्रथांचं सार मानता येईल. आई जगदंबा तिच्या सर्व भक्तांना आशीर्वचन देऊन सुख समृद्धी, तेज आणि अन्यायाशी लढण्याची शक्ती प्रदान करो, हीच तिच्या चरणी प्रार्थना. आई जगदंबेचा उदो उदो...

नवरात्रीचे वेध लागलेल्या स्त्रीवर्गातच नव्हे, तर सगळ्यांमध्येच उत्साह आणि चैतन्य खेळत असताना काय आहे नवरात्रीचं आध्यात्मिक आणि धार्मिक दृष्टीने महत्त्व...पितृपक्ष संपत येतो. वातावरण किंचित तापू लागतं. हवेमध्ये अजुनही थोडा थोडा पावसाळी ओलेपणा शिल्लक असतो. शरद ऋतूची चाहुल लागते. कधीतरी उत्तररात्री उशिरा आकाशाकडे नजर टाकली तर चांदणं दिसतं. खूप सुंदर दिवस असतात ते अणि रात्री त्याहून अधिक देखण्या. मग येतो अश्विन. अश्विन शुद्ध प्रतिपदा- घटस्थापना. आपल्याकडे खूप महत्त्व असलेलं शारदीय नवरात्र. ईश तत्त्व स्त्री रुपात अत्यंत मोहक, रम्य वाटतं. ही देवी अयोनी संभवा आहे, भक्त वत्सला आहे, मातृरूपिणी आहे. तिच्या सौंदर्याचं वर्णन करायला शब्द अपुरे आहेत. पण ती शस्त्रास्त्र धारण करणारीही आहे. दुष्टांचं निर्दालन करणारी आहे. शक्तीची पूजा अनादी काळापासून चालत आली आहे. जेव्हा असूर भयंकर माजले, तेव्हा ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या एकत्रित शक्तीपासून दुर्गा जन्मली. तिनं महिषासूर राक्षसाला मारून महिषासुरमर्दिनी हे नाव धारण केलं.



# अश्विन वर्ल्ड रेकॉर्डपासून एक पाऊल दूर!

## अश्विनला पुरस्कार द्यायचा वेस्ट इंडिज बोर्डाला विसर

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय संघाचा अनुभवी फिरकीपटू आर. अश्विनने बांगलादेशविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत उत्कृष्ट गोलंदाजी केली, ज्यात त्याने ११ विकेट घेतले. तर एका शतकासह त्याने फलंदाजीत एकूण ११४ धावा केल्या. त्याच्या या कामगिरीसाठी अश्विनला मालिकावीराचा पुरस्कार देण्यात आला. हा मालिकावीराचा पुरस्कार पटकावताच रविचंद्रन अश्विनने वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. पण अश्विनचा हा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे करण्यापासून एक पाऊल मागे राहिला आहे.**




भारत वि बांगलादेश मालिकेत मालिकावीराचा पुरस्कार पटकावताच रविचंद्रन अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये ११ वेळा हा पुरस्कार जिंकण्याचा मुथैय्या मुरलीधरन यांच्या विक्रमाची बरोबरी केली. पण आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. भारताच्या वेस्ट इंडिज दौऱ्यात अश्विनला मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आले होते, पण आता तो पुरस्कार त्याला देण्यात आला नसल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे तो १२ वेळा हा पुरस्कार पटकावण्याच्या विश्वविक्रमापासून फक्त एक पाऊल मागे आहे.वेस्ट इंडिज दौऱ्यावर टीम इंडियाने दोन कसोटी सामन्यांची मालिका १-० ने जिंकली. अश्विनने या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात ७१ धावांत ७ विकेट देऊन वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटीतील सर्वोत्तम गोलंदाजी केली. दोन सामन्यांत एकूण १५ विकेट घेत त्याने फलंदाजीतही जबरदस्त कामगिरी केली. असे असूनही, मालिका संपल्यानंतर वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड सादरीकरणादरम्यान अश्विनला मालिकावीराचा पुरस्कार देण्यास विसरले. त्यामुळे अश्विनच्या खात्यात हा पुरस्कार जमा होऊ शकले नाही.इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या बातमीनुसार, क्रिकेट वेस्ट इंडिजशी या संदर्भात संपर्क साधला असता त्यांनी प्रायोजकत्वाचे काम हाताळणाऱ्या भारतीय एजन्सीबद्दल सांगितले. पण त्यांच्याशी संपर्क साधला असता, भारतीय एजन्सीने सांगितले की ते फक्त व्यावसायिक बाबी हाताळतात. मालिकावीराचा पुरस्कारा देण्याची जबाबदारी क्रिकेट वेस्ट इंडिजची आहे. दोन किंवा अधिक सामन्यांच्या प्रत्येक मालिकेच्या शेवटी मलिकावीराचा पुरस्कार दिला जातो. जर वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान हा पुरस्कार देण्यास विसरले असेल, तर ते नंतर टीम इंडियाकडेही सोपवू शकले असते. मात्र आजतागायत या प्रकरणात काहीही घडले नाही. अश्विनला हा पुरस्कार मिळाला असता तर त्याने कानपूर कसोटी सामन्यादरम्यान मिळालेला मालिकावीराचा किताब जिंकून विश्वविक्रम केला असता. मात्र, अश्विन या यादीत अव्वल स्थानावर आहे कारण त्याने केवळ ३९ कसोटी मालिकेत ११ वेळा मालिकावीराचा पुरस्कार पटकावला आहे. तर मुरलीधरनने ६१ कसोटी मालिकेत ११ वेळा हा पुरस्कार पटकावला होता. आता अश्विनला न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेत मालिकावीराचा पुरस्कार मिळवून विश्वविक्रम करायचा आहे.

भारत वि बांगलादेश मालिकेत मालिकावीराचा पुरस्कार पटकावताच रविचंद्रन अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये ११ वेळा हा पुरस्कार जिंकण्याचा मुथैय्या मुरलीधरन यांच्या विक्रमाची बरोबरी केली. पण आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. भारताच्या वेस्ट इंडिज दौऱ्यात अश्विनला मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आले होते, पण आता तो पुरस्कार त्याला देण्यात आला नसल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे तो १२ वेळा हा पुरस्कार पटकावण्याच्या विश्वविक्रमापासून फक्त एक पाऊल मागे आहे.वेस्ट इंडिज दौऱ्यावर टीम इंडियाने दोन कसोटी सामन्यांची मालिका १-० ने जिंकली. अश्विनने या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात ७१ धावांत ७ विकेट देऊन वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटीतील सर्वोत्तम गोलंदाजी केली. दोन सामन्यांत एकूण १५ विकेट घेत त्याने फलंदाजीतही जबरदस्त कामगिरी केली. असे असूनही, मालिका संपल्यानंतर वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड सादरीकरणादरम्यान अश्विनला मालिकावीराचा पुरस्कार देण्यास विसरले. त्यामुळे अश्विनच्या खात्यात हा पुरस्कार जमा होऊ शकले नाही.इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या बातमीनुसार, क्रिकेट वेस्ट इंडिजशी या संदर्भात संपर्क साधला असता त्यांनी प्रायोजकत्वाचे काम हाताळणाऱ्या भारतीय एजन्सीबद्दल सांगितले.

### किताब जिंकून विश्वविक्रम केला असता

भारतीय एजन्सीने सांगितले की ते फक्त व्यावसायिक बाबी हाताळतात. मालिकावीराचा पुरस्कारा देण्याची जबाबदारी क्रिकेट वेस्ट इंडिजची आहे.दोन किंवा अधिक सामन्यांच्या प्रत्येक मालिकेच्या शेवटी मलिकावीराचा पुरस्कार दिला जातो. जर वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान हा पुरस्कार देण्यास विसरले असेल, तर ते नंतर टीम इंडियाकडेही सोपवू शकले असते. मात्र आजतागायत या प्रकरणात काहीही घडले नाही.अश्विनला हा पुरस्कार मिळाला असता तर त्याने कानपूर कसोटी सामन्यादरम्यान मिळालेला मालिकावीराचा किताब जिंकून विश्वविक्रम केला असता.

---

# रोहित शर्माने अक्षर पटेलची घेतली फिरकी

## रोहित धोनीच्या शॉटची नक्कल पाहून पाहा काय म्हणाला?

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**ल काही भारतीय खेळाडूंनी नेटफ्लिक्सवरील द ग्रेट इंडियन कपिल शर्मा शोमध्ये उपस्थिती लावली आहे. ज्याच्यामध्ये रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, अक्षर पटेल, शिवम दुबे आणि अर्शदीप सिंग हे खेळाडू आहेत. हा एपिसोड या आठवड्यात टेलिकास्ट होणार असून तत्पूर्वी नेटफ्लिक्स काही प्रोमो आणि छोटे व्हीडिओ शेअर करत आहेत.**




या शोमध्ये खेळाडूंनी दिलखुलास गप्पा मारल्या काही गेम्स खेळले तर काही मजेशीर खुलासेही केले. अशाच एका खेळाचा व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे.कपिल शर्मा शोमध्ये खेळाडूंना एक टास्क मिळाला की ज्यामध्ये समोरच्या खेळाडूच्या हातातील कार्डवर क्रिकेटपटूचं नाव असणार आणि समोरच्याने अभिनय करून ज्याच्या हातात कार्ड आहे त्याने हे ओळखायचं. रोहित शर्मा अभिनय पाहून ओळखणार होता तर अक्षर पटेल हा अभिनय करणार होता. यामध्ये कार्डवर महेंद्रसिंह धोनीचं नाव होतं.भारतीय संघाचा महान यष्टिरक्षक फलंदाज महेंद्रसिंग धोनी जितका प्रसिद्ध आहे तितकाच त्याचा खास ट्रेडमार्क शॉट 'हेलिकॉप्टर शॉट' देखील प्रसिद्ध आहे. मात्र अक्षर पटेल धोनीच्या या खास शॉटची कॉपीही करू शकला नाही, त्यामुळे रोहित शर्माने त्याची चांगलीच फिरकी घेतली. तर या व्हीडिओमध्ये घडलं असं की रोहित शर्माच्या हातात महेंद्रसिंह धोनीचं नाव लिहिलेलं कार्ड होतं आणि अक्षर पटेल समोर अभिनय करण्यासाठी सज्ज होता. अक्षरने सरळ एक षटकार लगावल्याचा अभिनय केला. विश्वचषकातील प्रसिद्ध षटकाराची नक्कल केली. पण रोहितला अक्षरचा अभिनय नेमका समजला नाही.

### प्रत्येकजण असे षटकार मारतो

कारण तो एक सामान्य षटकार होता जो सर्व फलंदाजांनी मारला होता. हा अभिनय पाहून रोहित म्हणाला, "प्रत्येकजण असे षटकार मारतो. थोड्या वेगळं काहीतरी करू दाखव.."रोहितचं बोलणं ऐकून सूर्यकुमार यादव उभा राहिला आणि म्हणाला, 'मी करून दाखवू का थांब मी दाखवतो, लगेच ओळखतील.' SKY ने धोनीचा हेलिकॉप्टर शॉटची नक्कल करून दाखवली, जे पाहून रोहितने एका सेकंदात 'MSD' असे म्हटले.